# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

### ४९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१६.०९.२०२५

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०९/२०२५ ते १६/०९/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१७/०९/२०२५ ते २१/०९/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ०.० | ०.८ | ०.० | १९.० | ११.४ | ९.८ | पाऊस (मिमी) | १६ | १० | ८ | ५ | ३ |
| २७.१ | २७.६ | २७.५ | २६.५ | २६.५ | २५.२ | २४.० | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २७ | २८ | २९ | ३० |
| १८.६ | १९.३ | २०.८ | २०.५ | २०.८ | २१.० | २१.२ | किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २२ | २१ | २१ |
| अ: ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८९ | ९१ | ९१ | ९५ | ९७ | ९७ | ९७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९८ | ९८ | ९८ | ९७ | ९५ |
| ७१ | ७० | ७६ | ८५ | ९४ | ९५ | ८९ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ७६ | ७९ | ७८ | ७८ |
| ३.० | ३.१ | ३.० | २.२ | २.२ | ३.० | २.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७.२ | ६.८ | ६.२ | ७.६ | ८.३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश**<br><br>**हवामान सतर्कता / इशारा:** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात दि. १७ ते २१ सप्टेंबर २०२५ दरम्यान तुरळक हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान २७-३० डिग्री सें. व किमान तापमान २१-२२ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ६-८ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>**कृषी क्षेत्रावरील प्रभाव आधारित अंदाज (IBF) आणि इशारा लक्षात घेता दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी (येलो अलर्ट) नाशिक जिल्हा तसेच घाट क्षेत्रातील एक-दोन ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, नाशिक जिल्ह्यात मुसळधार पाऊस तसेच घाट क्षेत्रात हलका ते मध्यम पाऊस व सोसाट्याचा वारा (३० ते ४० किमी प्रति तास) वेगाने वाहण्याची शक्यता आहे. दि. १८ व १९ सप्टेंबर २०२५ रोजी नाशिक जिल्हा तसेच घाट क्षेत्रातील एक-दोन ठिकाणी (येलो अलर्ट) मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस व सोसाट्याचा वारा (३० ते ४० किमी प्रति तास) वेगाने वाहण्याची शक्यता आहे. (१६.०९.२०२५ रोजी आरएमसी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित).** |
| **सामान्य सल्ला** | | **हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत व मेघगर्जनेसह पाऊस साठी दामिनी मोबाईल ॲपचा उपयोग करावा.**<br>पावसाचा व विजांचा अंदाज लक्ष्यात घेता पशुधन, कुक्कुट पक्षी आणि स्वतःचे विजांच्या कडकडाट पासून संरक्षण करावे व काढणी केलेल्या मुग व उडीद पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी.<br>उडीद: शेंगा वाळल्यावर कापणी करून खळ्यावर आणून त्याची मळणी करावी. शेंगा खळ्यावर चांगल्या वाळविल्यावर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे वेगळे करावेत. साठवणीपुर्वी उडीद ५ ते ६ दिवस उन्हात वाळवुन पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून उडीदाचे संरक्षण होते.<br>पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता ज्या ठिकाणी मुग व उडीद परिपक्व झाले आहे तेथे काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी.<br>**(नाशिक जिल्ह्यात एक दोन ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात किंवा स्वच्छ हवामानात वरील सर्व कामे पूर्ण करावीत.)** |
| **संदेश** | | **हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता परिपक्व झालेल्या खरीप पिकांची कापणी, मळणी, व फवारणीच्या कामांचे नियोजन करावे तसेच कापणी केलेल्या पिकांना ताडपत्रीने झाकून ठेवावे.** |
| **खरीप भात** | **फुटवे फुटणेची / पोटरी अवस्था अवस्था** | सध्याच्या सतत दमट व ढगाळ वातावरणामुळे भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे म्हणून लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस ०.२ % किंवा प्रोफेनोफॉस ०.२ % २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>नत्रयुक्त खते प्रमाणापेक्षा जास्त टाकू नयेत अन्यथा करपा रोगाचे प्रमाण वाढते.<br>पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी.<br>हलका ते मध्यम पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता सल्ला देण्यात येतो कि पावसाचे पाणी शेतात अडवून भात पिकात पाण्याची पातळी ३ ते ५ सेमी पर्यंत ठेवावी.<br>खाचरात रोपांच्या पोटरी अवस्थतेत पाण्याची पातळी १० सेमी असावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **खरीप नाचणी व वरई** | **फुटवे फुटणेची अवस्था / पोटरी अवस्था अवस्था** | नाचणी पिकावरील पाने खाणारी अळीसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बांधावरील गवत व तण उपटून नष्ट करावे. |
| **खुरासणी** | **फांद्या फुटण्याची अवस्था** | खुरासणी पिकाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी, खुरासणी पिकात कीटक परागीभवन घडवण्याकरिता एक मधमाश्यांचे कृत्रिम पोळे प्रति एकरसाठी वापरण्याचे शिफारस करण्यात आली आहे.<br>तसेच खुरासणी पिकात पाने खाणारी अळी आढळून आल्यास क्लोरोपायरीफॉस २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **बाजरी** | **कणसांत दाणे भरणेची अवस्था / पीक परिपक्वता** | फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या बाजरी पिकाला पाण्याची तिसरी पाळी द्यावी.<br>तसेच बाजरीचे कणीस हाताने दाबले असता त्यातून दाणे सुटणे, तसेच दाताखाली दाणा चावल्यानंतर कट्ट असा आवाज आल्यास, पिक कापणीस योग्य आहे असे समजावे. ताटाची कणसे विळ्याने कापून गोळा करावीत व वाळवून मळणी करावी.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **मका** | **दाणे भरणे ते पीक परिपक्वता** | मका पिकावरील अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट@ ४ ग्राम प्रती १० लि. पाण्यात **किंवा** थायोमेथोक्झाम + ल्याम्बडा सायहेलोथ्रीन@ ३ मिली प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>मका पिकास नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधक या बरोबरच जस्त या अन्नद्रव्याचा वापर करणे पीक पोषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **सोयाबीन** | **फुले लागणे ते शेंगा भरणेची अवस्था / आंतरमशागत** | सोयाबीनची अतिरिक्त कायिक वाढ रोखून उत्पादकता वाढविण्यासाठी, पीक फुले लागण्याच्या अवस्थेत असताना सायकोसील (क्लोरमेक्वॅट क्लोराईड ५० एसएल) या संजीवकाच्या ५०० पी.पी.एम. द्रावणाची (१ मिलि प्रति लिटर पाणी) फवारणी करावी.<br>सोयाबीनवरील हेलीकोव्हर्पा, उंट अळी व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा नियंत्रणासाठी, क्विनालफॉस ०.२ % किंवा प्रोफेनोफॉस ०.२ % २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>तसेच सोयाबीनवरील खोडमाशीच्या नियंत्रणासाठी, फिप्रोनील ०.२ % २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **भुईमुग** | **शेंगा भरणेची अवस्था** | अन्नद्रव्य फवारणी<br>भुईमुगाच्या शेंगा भरत असताना आकार व वजन वाढण्यासाठी सल्फेट ऑफ पोटॅश (०-०-५०) ७५ ग्रॅम अधिक मल्टी मायक्रोन्यूट्रिएंट ५० ग्रॅम प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **द्राक्षे** | | काडीची अनियमित परिपक्वता<br>खरडछाटणीनंतर सूक्ष्मघडनिर्मितीच्या कालावधीत नत्र बंद करून पाणी कमी केले जातेण् आपल्याकडे असलेल्या वेगवेगळ्या द्राक्षजातींनुसार वाढीचा वेग कमी-अधिक असतो. जमिनीचे प्रकारही वेगवेगळे असल्यामुळे जलधारणक्षमताही कमी-अधिक असते. यामुळे वेलीला नेमका ताण किती द्यायचा, याचे गणित आपल्याकडे नसते. साधारण परिस्थितीत पाण्याचा ताण देतो, त्यावेळी फुटींची वाढ नियंत्रणात राहते. जमिनीत दिलेल्या पाण्यानुसार बगलफुटी कमी-अधिक प्रमाणात निघतात. मात्र वेलीला पाण्याचा ताण जास्त बसल्यामुळे काडीच्या परिपक्वतेमध्ये अनियमितता दिसून येईल. काडी परिपक्वतेच्या कालावधीत साधारण जून-जुलै महिन्यांमध्ये झालेल्या पावसामुळे वेलीमध्ये काही बदल दिसून येतात. यावेळी एक प्रकारचा दाब वेलीवर निर्माण होतो. कॅनॉपीमध्ये वरील बाजूस पानांच्या वाट्या झालेल्या दिसून येतात. काही पानांवर स्कॉर्चिंगची स्थितीही दिसून येईल. काडीची परिपक्वता पाहता एक पेरा परिपक्व होऊन पुढील पेरा हिरवा दिसतो. पुन्हा त्यानंतर पेरा परिपक्व झालेला किंवा परिपक्व होताना दिसून येतो. ही स्थिती मुख्यतः वेलीमध्ये बोट्रिडिप्लोडियामुळे दिसून येईल. यावेळी यासाठी फार काही करता येत नसले तरी वेलीला ताण बसणार नाही, यासाठी उपाययोजना महत्त्वाच्या ठरतील.<br>जमीन नेहमी वाफशात राहील, अशाप्रकारे पाण्याचे नियोजन करावे,<br>ज्या बागेत काडी अपरिपक्व असून, परिपक्वतेला नुकतीच सुरुवात झालेली आहे, अशाठिकाणी बोर्डो मिश्रण किंवा ताम्रयुक्त बुरशीनाशकाची फवारणी किंवा ड्रेंचिंग फायद्याचे ठरेल.<br>या बागेत वाढ एकदम नियंत्रणात न ठेवता दोन-तीन पाने पुन्हा वाढतील, अशा हिशेबाने नत्रयुक्त खतांचा वापर कमी प्रमाणात पण एक-दोनवेळा करता येईल. उदा. युरिया ०.५-०.७५ किलो एकरी याप्रमाणे ठिबकद्वारे एक किंवा दोन दिवसांआड दिल्यास वेलीची वाढ थोडीफार होऊन वेलीवर ताण थोडा कमी होईल.<br>ताम्रयुक्त किंवा ट्रायअझोल गटातील बुरशीनाशक १.५-२ मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **डाळिंब** | | फळांतील रस शोषणारा पतंग<br>बागेत व बागेच्या आजूबाजूला गुळवेल, वासनवेल, घाणेरी, एरंडी या यजमान वनस्पति असतील तर काढून टाकाव्यात.<br>बागेतील गळून पडलेली व कुजणारी फळे गोळा करून गाडून टाकावीत.<br>फळांतील रस शोषणाऱ्या पतंगांनी छिद्र पाडलेली फळे काढून टाकू नयेत. कारण पतंग पुन्हा त्याच फळावर बसेल व दुसरे फळ खराब करणार नाही. मात्र अशा फळांची कूज टाळण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>मर्यादित क्षेत्रावर सूर्यास्तानंतर टॉर्च व हातातील नेटच्या साह्याने फळांतील रस शोषणारे पतंग पकडून मारून टाकावेत.<br>बागेच्या प्रत्येक कोपऱ्यावर १५०-२०० वॅट फ्लूरोसंट दिवे एकमेकांकडे तोंड करून उभारावेत. |
| **आंबा** | | हवामान अंदाजानुसार पावसाची उघडझाप आणि कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण आहे. यामुळे नवीन येणाऱ्या पालवीचे तुडतुडे आणि मिज माशीच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन (२.८ ईसी) ०.९ मि.लि.) प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबा बागेतील गवत, रोगग्रस्त फांद्या काढून बागेची साफसफाई करावी आणि नंतर कीटकनाशकाची फवारणी घ्यावी. |
| **कांदा** | **रोपवाटिका व्यवस्थापन** | रोपवाटिकेत ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धती वापरण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रुंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. त्यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते. पाणी फार काळ साचून राहत नाही, त्यामुळे रोपे कुजत किंवा सडत नाहीत. तसेच लावणीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पालाश प्रति २०० वर्ग मीटर याप्रमाणात खते द्यावीत. रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर रेघा पाडून १-१.५ सें.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकावे. नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. तण नियंत्रणासाठी रोपे उगवण्यापूर्वी वाफ्यावर पेंडीमिथॅलीन २ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून, ८०० ग्रॅम प्रति २०० वर्ग मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **टोमॅटो** | | ब्लॉसम एंड रॉट<br>टोमॅटो पिकामध्ये कॅल्शिअम या अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे होणाऱ्या ब्लॉसम एंड रॉट साठी पुढील उपाययोजना कराव्यात .<br>माती परीक्षणानुसार कॅल्शिअमची कमतरता असल्यास पिकाच्या सुरुवातीच्या काळापासून कॅल्शिअमयुक्त खते वापरावीत.<br>जमिनीमधून कॅल्शिअम नायट्रेट, सिंगल सुपर फॉस्फेट तसेच जिप्समद्वारेसुद्धा कॅल्शिअमचा पुरवठा केला जाऊ शकतो.<br>टोमॅटो पुनर्लागवडीनंतर रोपावस्था, फुलधारणा, फळधारणा या अवस्थेत चिलेटेड कॅल्शिअम ०.५ ते १ ग्रॅम किंवा कॅल्शिअम क्लोराईड २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.<br>**(नाशिक जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित करव्यात.)** |
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | विजांचा कडकडाटासह पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता प्राण्यांना खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवा, पावसापासून पशुधन व कुक्कुट पक्ष्यांचे साठवलेले पशुखाद्य, चारा व कडबा याचे प्लास्टिक/ ताडपत्रीने झाकून संरक्षण करावे.<br>जोरदार पावसापासून पशुधनाचे संरक्षण करावे व त्यांना चारण्यास किंवा इतर कारणास्तव बाहेर नेण्यास टाळावे.<br>जनावरांचा गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा.<br>पाऊस व विजांपासून पशुधनाचे संरक्षण करावे व त्यांना चारण्यास किंवा इतर कारणास्तव बाहेर नेण्यास टाळावे.<br>जनावरांचा गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा.<br>प्राण्यांना ट्रॅक्टर आणि इतर धातूंच्या शेतीच्या उपकरणांपासूनदूर ठेवा.<br>आपल्याप्राण्यांना झाडाखाली जमू देऊ नका. प्राण्यांकडे लक्ष ठेवा आणि त्यांना आपल्या थेट नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करा<br>गुरे व शेळ्यांना शेडमध्ये ठेवा आणि त्यांना विजांचा कडकडाटपासून वाचवण्यासाठी प्राण्यांना खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवा.<br>जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे.<br>पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास शेतातील कामकाज त्वरित थांबवून जनावरांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी हलवावे.<br>गोठ्यातील छत आणि भिंती धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात.<br>जनावरे पाण्यात असतील तर तात्काळ त्यांना बाहेर काढा. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **शेळी** | **आरोग्य व्यवस्थापन** | दूषित चारा आणि पाण्यातून जंत शेळ्या-मेंढ्यांच्या शरिरात प्रवेश करून पचन संस्थेमध्ये, रक्तामध्ये व विविध अवयवांमध्ये वाढतात. त्यामुळे शरीरातील रक्त कमी होणे, जनावर अशक्त होणे, वजन घटणे, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. जंत वाढल्यानंतर उपचार करण्यापेक्षा ते वाढू नयेत. म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजनेच योग्य ठरेल.<br>लेंडीच्या ढिगाभोवती शेळ्या चरायला सोडू नये.<br>सकाळी गवताच्या टोकावर असलेल्या दवामध्ये जंताच्या अळ्या असतात. त्यामुळे सकाळच्या वेळेस शेळ्यांना चरायला सोडू नये.<br>चरण्यास जाणाऱ्या शेळ्यांना जंताची लागण होतच राहते. म्हणून पावसाळा सुरू होताना आणि पावसाळा संपताना असे दोनदा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जंतनाशक पाजावे.<br>लेंड्यांची तपासणी करून आवश्यक असल्यास औषध पाजावे.<br>गोठा नेहमी स्वच्छ व कोरडा ठेवावा.<br>तळ्याच्या परिसरात अथवा दलदलीत शेळ्यांना चरू देऊ नये.<br>तळ्याच्या परिसरातील गोगलगाईंमध्ये काही जंतांच्या अळ्या वाढतात. म्हणून गोगलगाय निवारणासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. तळ्यात बदक पाळण्यानेही गोगलगाईंचा नायनाट होतो.<br>हिरवा चारा थोडा वेळ उन्हात वाळवून मगच द्यावा. |
| **मेंढी** | **सप्टेंबरमधील मेंढ्यांतील** | जनावरांचा गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा.<br>या महिन्यामध्ये मेंढ्या विण्याचे प्रमाण जास्त असते. गाभण मेंढ्यांची विशेष काळजी घ्यावी.<br>व्यायलेल्या मेंढ्या व नवजात कोकरांची योग्य निगा राखावी.<br>मेंढ्या व्यायल्यानंतर वाडा गरम पाण्याने स्वच्छ करून घ्यावा.<br>जन्मानंतर १ तासाच्या आत कोकरांना चिक पाजावा.<br>दूध देणाऱ्या मेंढ्यांना प्रती मेंढी ४०० ग्रॅम पशुखाद्य खाऊ घालावे.<br>माजावर आलेल्या मेंढ्या ओळखून कळपामध्ये मेंढा नर सोडावा. |
| **कुक्कुटपालन** | **आरोग्य व्यवस्थापन** | परसबागेतील कोंबड्यांना गोलकृमी आणि पट्टकृमी यांचा प्रादुर्भाव होत असतो. कोंबड्यांमध्ये कृमीचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास येणे कठीण असते. म्हणून ठराविक कालावधीनंतर पशुवैद्यकांच्या सल्ल्याने गोलकृमी व पट्टकृमीनाशकाची मात्रा देणे गरजेचे आहे.<br>उपाययोजना<br>कोंबड्यांना कृमीनाशकाची मात्रा पाणी किंवा खाद्यामधून द्यावी.<br>विदेशी कोंबड्यांपेक्षा परसातील कोंबड्यांना गोलकृमी (अस्कॅरीडीया गॅली) आणि पट्टकृमी (रॅलीटीना) यांचा प्रादुर्भाव होत असतो. म्हणून ठराविक कालावधीनंतर गोलकृमीनाशक व पट्टकृमीनाशकांची मात्रा देणे हे आर्थिकदृष्ट्या परवडते.<br>एका कोंबडीला जंतनाशक औषधी देण्याचा खर्च केवळ दोन ते तीन रुपये येतो. अस्कॅरीडीया गॅली या कृमीबरोबर बऱ्याच कृमींचा प्रादुर्भाव कोंबड्यांना होतो. हे लक्षात घेऊन जंतनाशकाची शिफारशीनुसार मात्रा द्यावी.<br>कृमीच्या नियंत्रणासाठी परसबागेमध्ये पाळलेल्या कोंबडी पिलांना एक ते तीन महिन्यांपर्यंत दोन वेळेस जंतनाशकाची मात्रा देणे गरजेचे असते.<br>मोठ्या कोंबड्यांना विशेषतः पावसाळ्यामध्ये गोलकृमीनाशक व पट्टकृमींनाशकाची मात्रा एक ते दोन वेळेस द्यावी. यामुळे जंताचा प्रादुर्भाव कमी होऊन वजन आणि अंडी उत्पादनात वाढ होते. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : १६.०९.२०२५

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**